# महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ

## महामंडळाचे सन २०१२-१३ चे वार्षिक अहवाल सभागृहास सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे खालीलप्रमाणे -

१) सदर महामंडळाची स्थापना दि. २१.११.२००१ च्या शासन निर्णयान्वये झाली आहे. सदर महामंडळाचे जिल्हास्तरावर कार्यालय नसल्याने दि.१०.०६.२००३ अन्वये जिल्ह्याचे कामकाज महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडे सोपविण्यात आले. तद्नंतर दि. ११.०४.२००५ रोजी जिल्ह्याचे कामकाज महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाकडे सोपविण्यात आले. यास्तव सदर महामंडळाची स्थापना झाल्यापासुन जिल्हास्तरीय कामकाज इतर महामंडळाच्या कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येत असल्याने तसेच जिल्हास्तरावर लेखाविषयक काम करण्याकरीता लेखापालची नेमणुक केलेली नसल्याने लेखाविषयक कामकाजात विलंब झाला.

२) महामंडळाचे जिल्हास्तरीय कामकाज इतर महामंडळाच्या अधिकारी/ कर्मचा-यांकडून करुन घेण्यात येते, तसेच जिल्हास्तरावर सदर महामंडळाचे स्वतंत्र अधिकारी /कर्मचारी वर्ग नाही.

३) सदर महामंडळाचे जिल्हा स्तरावर कार्यालय तसेच नियमीत कर्मचारी वर्ग नसल्याने शासन आदेशानुसार जिल्हा स्तरावरील कामकाज दि.११.०४.२००५ पासुन .महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाकडे सोपविण्यात आले. सदर महामंडळाची स्थापना झाल्यापासून जिल्हास्तरीय कामकाज इतर महामंडळाच्या कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येत होते. त्या-त्या महामंडळाची कामे सांभाळून या महामंडळाचे **अतिरिक्त कामकाज** पहावे लागते. त्यामुळे लेखाविषयक कामकाजास विलंब झाला.

४) वित्त विभागाच्या सूचनेनूसार बाहयसेवेतील कर्मचारी वर्ग मानधन तत्वावर कार्यरत आहे; परंतू प्रशिक्षणाअभावी योग्य माहिती मिळण्यास विलंब झाला व पर्यायाने लेखे पुर्ण करणे कामी याचा परिणाम झाला.

५) या महामंडळास फक्त १३ नियमित अधिकारी कर्मचाऱ्यांची पदे मुख्यालयासाठी मंजूर आहेत. त्यापैकी ५ पदे रिक्त होती व ८ पदे भरलेली होती. नियमीत कर्मचारी वर्ग कमी असल्याने काम वेळेत होणे शक्य होत नसल्याने वार्षिक लेखे परिपुर्ण होण्यास विलंब झाला.

६) या महामंडळाचे सन २०११-१२ पर्यंतचे लेखे विधान मंडळासमोर सादर केले असून सन २०१२-१३ चे लेखे अधिवेशनात सादर करण्यात येत आहेत. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ चे संविधानिक लेखापरीक्षण पूर्ण झाले असुन महालेखाकार यांचेमार्फत लेखापरिक्षण सुरू आहे. सन २०१०-११ ते २०१३-१४ पर्यंतचे अंतर्गत लेखापरिक्षणांचे कामकाज करण्यास्तव दि. १२.०९.२०१२ रोजी मे. एन. के. भट यांची नियुक्ती करण्यात आली. तथापि मे. एन. के. भट यांनी लेखापरीक्षणाचे कामकाज अपूर्ण अवस्थेत सोडून दिल्यामुळे लेखापरिक्षण कामी विलंब झाला. तदनंतर वरील कामकाजाकरीता मे. सुनिल पाटील कंपनी, सनदी लेखापाल यांची नियुक्ती करण्यात आली.

७) सन २०१२-१३ या वर्षाच्या लेख्यांबाबत संविधानिक लेखापरिक्षकांमार्फत दि. २९.०९.२०२१ रोजी अहवाल प्राप्त झाला. सदर अहवाल महालेखाकार,मुंबई यांना सादर केला असता दि.२१.०२.२०२२ च्या पत्रान्वये महालेखाकार कार्यालयाकडून त्यांचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत.

८) महालेखाकार कार्यालयाकडून त्यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष म.रा.दिव्यांग वि.वि. महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली दि. १५.०२.२०२३ रोजी वार्षिक सर्वसाधारण बैठक आयोजित केली. वार्षिक सर्वसाधारण बैठकीत संचालक मंडळाची मान्यता घेण्यात आली. या नियमित कार्यालयीन प्रक्रिया राबविताना काही कालावधी व्यतीत झाला.

सद्यस्थितीत सर्व प्रक्रिया पूर्णपणे राबवून या महामंडळाचे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे लेखे अंतिम करुन वार्षिक अहवाल विधानमंडळाच्या पटलावर सादर करण्यात येत आहे.

महाव्यवस्थापक
महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ
मुंबई - ५१